**नियमीति दिवाणी दावा क्र ८९४/२०२५**
रोहिदास वि. मंगल व इतर
CNR No. MHOS140010692025

## <u>अर्ज निशाणी क्र. २४ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल करुन असे कथन केले की अर्ज निशाणी क्रमांक २० वरील आदेशान्वये वादीच्या नावे असलेली मौजे कात्राबाद येथील जमीन गट क्रमांक २/क मधील ३० आर क्षेत्र तसेच वादीच्या जमिनीच्या उत्तर बाजुने असलेली प्रतिवादी क्रमांक १ ते ११ व १४ यांची गट क्रमांक ३/क मधील जमीन तसेच वादीच्या जमिनीच्या पुर्वेकडील गट क्रमांक ४/अ मधील प्रतिवादी क्रमांक १२ व १७ यांच्या जमिनी आहेत. पुढे असे कथन केले की वादी व प्रतिवादी यांच्या जमिनी मोजणी करुन हद्दीखुणा कायम करण्याबाबत तसा आदेश तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांना दिनांक ०९.०४.२०२५ रोजी करण्यात आला. परंतु, अनावधानाने वादीच्या नावे असलेली गट क्रमांक २/क चा उल्लेख करण्यात आला आणि प्रतिवादींच्या गटाचा उल्लेख करण्यात आला नाही. तांत्रीक अडचणीमुळे संबंधीत कोर्ट कमिशनर यांना मोजणीचे काम करता येणार नाही. आणि उभय पक्षातील वादविषय संपुष्टात येणार नाही. तरी अर्ज नि. क्र. २० वर झालेल्या आदेशात वादी व प्रतिवादी यांच्या नावे असलेल्या जमिनी गट क्रमांकच्या तपशीलासह नमुद करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. अर्जास प्रतिवादीच्या विधीज्ञांनी त्यांचे लेखी म्हणणे देवून अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

३. उभय पक्षांचे लेखी कथन व त्यांचे विधीज्ञांचा युक्तीवादावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले असून त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

**<u>मुद्दे</u>**

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणयास पात्र आहे काय ? | होय |

| | | |
|---|---|---|
| २. | कोणता आदेश? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

४. संचिकेले अवलोकन केले असता वाद जमीन वादीच्या मालकी ताबेवहिवाटीची असल्याचे घोषीत होऊन मिळण्याकरिता तसेच निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, वादी व प्रतिवादी यांच्या जमिनी मोजणी करुन हद्दीखुणा कायम करण्याबाबत तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांना कोर्ट कमिशनर म्हणून नेमुन तसे आदेश पारीत करण्याबाबत वादीतर्फे अर्ज नि. क्र. २० दाखल करण्यात आला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने दिनांक ०९.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजुर केला आहे. अर्ज नि. क्र. २० वरील आदेशाचे अवलोकन केले असता गट क्रमांक २/क मधील वादी व प्रतिवादी यांच्या नावे असलेल्या जमिनीची मोजणी करुन नकाशासह तसा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु प्रतिवादी यांचे नावे असलेल्या गट क्रमांकाचा उल्लेख स्पष्टपणे आदेशात नमुद करण्यात आला नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांचे जमिनीचज मोजणी करण्यास कोर्ट कमिशनर यांना तांत्रीक अडचण निर्माण होत आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे त्याअनुषंगाने मी मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि. क्र. **२४ मंजुर** करण्यात आला.

२. अर्ज नि. क्र. २० वरील आदेश कायम ठेवून तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांना पुढील आदेश देण्यात येतो की त्यांनी मौजे कात्राबाद येथील जमीन गट क्रमांक २/क मधील वादीच्या नावे असलेले ३० आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक १ च्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील ५३ आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक २ च्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील २७ आर क्षेत्र व गट क्रमांक २/क मधील ३० आर, प्रतिवादी क्रमांक ३ च्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील ५४ आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक ४ च्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील २७

आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक ५ ते ८ यांच्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील सामाईक क्षेत्र २७ आर व गट क्रमांक २/क मधील ३० आर, प्रतिवादी क्रमांक ९ ते १० यांच्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील दोन तुकडयात असलेले सामाईक क्षेत्र त्यापैकी एक तुकडा २० आर व दुसरा तुकडा २० आर, प्रतिवादी क्रमांक ११ च्या नावे असलेले गट क्रमांक २/ब मधील क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक १२ च्या नावे असलेले गट क्रमांक ४/अ मधील २० आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक १३ च्या नावे असलेले गट क्रमांक २/क मधील २९ आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक १४ च्या नावे असलेले गट क्रमांक ३/क मधील २७ आर क्षेत्र व गट क्रमांक २/क मधील ३० आर, प्रतिवादी क्रमांक १५ च्या नावे असलेले गट क्रमांक २/क मधील ६० आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक ९ च्या नावे असलेले गट क्रमांक २/क मधील ६० आर क्षेत्र, प्रतिवादी क्रमांक १७ च्या नावे असलेले गट क्रमांक ४/अ मधील १ हे. ७१ आर क्षेत्र, या जमिनीच्या मोजणी करुन तसा अहवाल नकाशासह दाखल करण्यात यावा.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.10.01 11:56:32 +0530

दिनांकः–३०.०९.२०२५

**(अ. अ. शेख)**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 11-07-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 11-07-2025 |
| Order uploaded on | - | 11-07-2025 |